SAMPLE CONTENT

PERFECT

# मराठी अक्षरभारती

BASED ON TEXTBOOK AND BOARD PAPER PATTERN



'काझीरंगा' अभयारण्याची अनोखी सफर! हुलॉक वानर व आसामचे प्रतीक असलेला एकशिंगी गेंडा हे 'काझीरंगाचे' प्रमुख वैशिष्ट्य आहे.


सौ. अनिता म्हात्रे
M.A. B.Ed.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.


STD. IX
(Eng. Med.)


Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित

PERFECT

# मराठी अक्षरभारती

## इयत्ता नववी (English Medium)

### ठळक वैशिष्ट्ये

- इयत्ता १० वीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- पाठांचे परिच्छेदांमध्ये विभाजन.
- पाठाखालील सर्व कृतींचा समर्पक उत्तरांसहित समावेश.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- व्याकरणाच्या अधिकाधिक सरावाकरता प्रत्येक पाठ, कविता व स्थूलवाचनाच्या अंती व्याकरण व भाषिक घटकांवर आधारित कृतींचा समावेश.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- स्वयंअध्ययनासाठी परिपूर्ण मार्गदर्शक.

Sample Content

Printed at: **Prabodhan Prakashan Pvt. Ltd.,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 3627**

P.O. No. 13605

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

नववीचं वर्ष म्हणजे दहावीचा पाया असतो, त्यामुळे नववीला वेगळं महत्त्व आहे. या वर्गाकरता शासनाने पारंपरिक शिक्षण पद्धतीत परिवर्तन साधत ज्ञानरचनावादावर आधारित अभ्यासक्रम योजला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास घडवणारा तर आहेच, शिवाय विद्यार्थ्यांना भाषेचा लळा लावणारा व भाषेच्या बळावर त्यांच्यातील आकलनशक्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता या गुणांचा विकास करणारा आहे. या अभ्यासक्रमाशी ओळख करून देण्यासाठी आणि हसतखेळत भाषा आत्मसात करण्यासाठी टार्गेट प्रकाशनाचे **PERFECT मराठी अक्षरभारती : इयत्ता नववी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

इयत्ता दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाला आधारभूत मानून या पुस्तकाची निर्मिती केली आहे. दहावीच्या अद्ययावत प्रारूपाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा व त्या दृष्टीने अध्ययन करणे सोपे व्हावे हा यामागील मूळ उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन यांसारखी भाषिक कौशल्ये विकसित करणे तसेच वैचारिकता व कल्पनाशक्ती विकसित करणे ही या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार कृतींची मांडणी हे टार्गेट प्रकाशनाच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. पुस्तकाची सहज, सुलभ, सोपी भाषा ही मुलांना भाषेत जाणवणारी क्लिष्टता दूर करून त्यांच्यामध्ये विषयाची आवड निर्माण करण्यास सक्षम आहे.

परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करता अधिकाधिक सरावासाठी मुबलक कृतींची सोप्या शब्दांत रचना केली आहे. व्याकरण हा भाषेचा आत्मा असतो हे जाणून व्याकरणाच्या सरावावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना व्याकरणावर पर्यायाने भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे होईल. हे पुस्तक मुलांची परीक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गरज भागवण्यास समर्थ आहेच शिवाय ते विद्यार्थ्यांमध्ये भाषेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन निर्माण करणारेही आहे.

या पुस्तकाचे अंतरंग अधिक सुंदर आणि ज्ञानाशयाने समृद्ध असून एका दृष्टिक्षेपात ते जाणता यावे याकरता पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये पुढे सोदाहरण दर्शवली आहेत.

या पुस्तकात प्रत्येक अभ्यासघटकाचा सर्वांगाने परामर्श घेतला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक एक परिपूर्ण मार्गदर्शक ठरेल अशी आम्हांला खात्री वाटते. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया. परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोतच.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** चौथी

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# KEY FEATURES

***Central idea of the Chapter / Poems:*** The summary of all chapters and poems has been provided in Marathi for quick understanding of the central idea of the chapter/poem.

***Paraphrase of Poem:*** For greater clarity the paraphrase of the complete poem has been provided in simple and lucid language.

***Glossary:*** A Glossary containing the meanings of all the difficult words and phrases from the chapter has been provided. For the convenience of the students these words have been arranged alphabetically.

***Notes:*** Notes providing explanation of the difficult concepts in lucid language have been provided. These notes have been arranged alphabetically.

***Segregation of chapters into extracts:*** For better understanding all the chapters have been segregated into extracts with ample activities based on them.

***Integrated Questions:*** The textual questions requiring holistic answers have been covered under this header in each chapter.

***Activities based on grammar and language Study*** : For ensuring ample practice, we have provided this special section at the end of each chapter and poem, which extensively covers all the language study and grammar activities.

***Unseen Passage:*** A separate section with plenty of unseen passages along with activities based on them has been provided to ensure substantial practice.

***Dedicated Grammar Section***: For thorough understanding of grammar a dedicated section on Grammar has been provided. This section covers explanation of the concepts and ample examples with practice questions based on 'समास, अलंकार, शब्दांच्या जाती, सरळरूप, सामान्यरूप, प्रत्यय, काळ, वाक्यांचे प्रकार, वाक्यरूपांतर (वाक्यपरिवर्तन), विरामचिन्हे, शब्दसमूहाबद्दल एक शब्द'.

***Writing Skills:*** This section towards the end of the book includes all the writing skills activities prescribed for the students, with the explanation of concepts in lucid language. It contains chapters on 'पत्रलेखन, गद्य आकलन, कथालेखन, जाहिरातलेखन, मुलाखत, संवादलेखन, वृत्तांतलेखन, लेखनकौशल्य'.

***Internal Assessment:*** The break-up of the 20 Marks for internal assessment, weightage allotted to different skills and guidelines for the same have been provided.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठ / कविता | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | सर्वात्मका शिवसुंदरा (प्रार्थना) | कुसुमाग्रज | १ |
| २. | संतवाणी (अ) भेटीलागी जीवा | संत तुकाराम | २ |
| | संतवाणी (आ) संतकृपा झाली | संत बहिणाबाई | ७ |
| ३. | ‘बेटा, मी ऐकतो आहे !’ | व. पु. काळे | १२ |
| ४. | जी. आय. पी. रेल्वे | प्रबोधनकार ठाकरे | २३ |
| • | काझीरंगा (स्थूलवाचन) | वसंत अवसरे | ३० |
| ५. | व्यायामाचे महत्त्व (कविता) | राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | ३५ |
| ६. | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ | बाळ ज. पंडित | ४० |
| ७. | दिव्याच्या शोधामागचे दिव्य | डॉ. अनिल गोडबोले | ४८ |
| ८. | सखू आजी | राजन गवस | ५५ |
| • | हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन) | मधुकर धर्मापुरीकर | ६२ |
| ९. | उजाड उघडे माळरानही (कविता) | ललिता गादगे | ६६ |
| १०. | कुलूप | श्री. कृ. कोल्हटकर | ७२ |
| ११. | आभाळातल्या पाऊलवाटा | | ७९ |
| १२. | पुन्हा एकदा (कविता) | प्रतिमा इंगोले | ८६ |
| • | व्हेनिस (स्थूलवाचन) | रमेश मंत्री | ९१ |
| १३. | तिफन (कविता) | विठ्ठल वाघ | ९५ |
| १४. | ते जीवनदायी झाड | भारत सासणे | १०१ |
| १५. | माझे शिक्षक व संस्कार | शंकरराव खरात | १०८ |
| १६. | शब्दांचा खेळ | हेलन केलर | ११५ |
| • | विश्वकोश (स्थूलवाचन) | | १२२ |
| १७. | अपठित गद्य आकलन | | १२७ |
| | **व्याकरण विभाग** | | |
| १ | समास | | १३३ - १४७ |
| २. | अलंकार | | |
| ३. | शब्दांच्या जाती | | |
| ४. | सरळरूप, सामान्यरूप, प्रत्यय | | |
| ५. | काळ | | |
| ६. | वाक्यांचे प्रकार | | |
| ७. | वाक्यरूपांतर (वाक्यपरिवर्तन) | | |
| ८. | विरामचिन्हे | | |
| ९. | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | | |


sample content

| उपयोजित लेखन | | | |
|---|---|---|---|
| १. | पत्रलेखन | | १४८ |
| २. | गद्य आकलन | | १५९ |
| ३. | कथालेखन | | १६० |
| ४. | जाहिरातलेखन | | १६४ |
| ५. | मुलाखत | | १६८ |
| ६. | संवादलेखन | | १७० |
| ७. | वृत्तांतलेखन | | १७२ |
| ८. | लेखनकौशल्य | | १७५ |
| • | अंतर्गत मूल्यमापन | | १८२ |


**[टीप : पाठ्यपुस्तकातील प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत. ]**

## अक्षरभारती गुणविभागणी

| लेखी परीक्षा | | | |
|---|---|---|---|
| **घटकनिहाय गुणविभागणी** | | | |
| **अनु. क्र** | **घटक** | **गुण** | **विकल्प गुण** |
| १ | **गद्य** | १८ गुण | |
| २ | **पद्य** | १६ गुण | ८ गुण |
| ३ | **स्थूलवाचन** | ०६ गुण | ३ गुण |
| ४ | **भाषाभ्यास** | १६ गुण | २ गुण |
| ५ | **उपयोजित लेखन** | २४ गुण | ३३ गुण |
| | **एकूण गुण** | ८० गुण | ४६ गुण |

**अंतर्गत मूल्यमापन – २० गुण**

| | | |
|---|---|---|
| अ. | श्रवण कौशल्य | ०५ गुण |
| आ. | भाषण कौशल्य | ०५ गुण |
| इ. | स्वाध्याय | १० गुण |

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

[**टीप :** वरील माहिती दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित आहे.]


Don't lose out on marks in Grammar & Writing Skills
Practice more & score full with Target's **"व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन"** Scan the adjacent QR Code and go for it now.

Sample Content

Sample Content

# २ संतवाणी

## (अ) भेटीलागी जीवा

संत तुकाराम [तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे)]

**टीप : सर्व कवितांवर आधारित कृतींचे स्वरूप हे इयत्ता १०वी च्या नवीन कृतिपत्रिका प्रारूपानुसार केलेले आहे.**

### अभंगाचा आशय

'भेटीलागी जीवा' या अभंगात संत तुकारामांनी चंद्रमा - चकोर, दिवाळसण-लेक, भुकेले बाळ-आई अशा समर्पक दृष्टांतांतून (उदाहरणांतून) आपल्या मनातील विठ्ठलभेटीची तीव्र ओढ व्यक्त केली आहे. भगवंताच्या भेटीला आतुरलेल्या त्यांच्या मनाचे येथे दर्शन घडते.

### अभंगाचा सरळ अर्थ

तुकाराम महाराज म्हणतात,

**'भेटीलागीं जीवा......................... वाट तुझी।।'**

हे विठ्ठला, माझ्या जीवाला तुझ्या भेटीची ओढ लागली आहे. रात्रंदिवस मी तुझी वाट पाहत आहे.।।१।।

**'पूर्णिमेचा चंद्रमा..........................वाट पाहे।।'**

पौर्णिमेचा चंद्र चकोर पक्ष्यासाठी जीवन असते. तो जसा पौर्णिमेच्या चंद्राची वाट पाहतो. तसेच, माझे मनही तुझी आतुरतेने वाट पाहत आहे.।।२।।

**'दिवाळीच्या मुळा..........................पंढरीची।।'**

माहेराच्या ओढीने लेक जशी दिवाळीची वाट पाहत असते तसाच मीही (माझ्या माहेराची) पंढरीला जाण्याची वाट पाहत आहे.।।३।।

**'भुकेलिवा बाळ..........................माउलीची।।'**

भुकेले तान्हे बाळ जसे आपल्या माऊलीची (आईची) वाट पाहत असते, (तिच्यासाठी ते रडून रडून गोंधळ घालते, आईच्या दुधासाठी जसे ते आसुसलेले असते) तसाच मीही विठूमाऊलीच्या दर्शनासाठी आसुसलो आहे.।।४।।

**'तुका म्हणे..............................दांवी देवा।।'**

पांडुरंगा, मला तुझ्या दर्शनाची भूक लागली आहे. त्या भुकेने मी व्याकुळ झालो आहे. तेव्हा, हे देवा! तू आता धावत येऊन तुझे श्रीमुख मला दाखव. म्हणजेच तुझे दर्शन दे.।।५।।

### शब्दार्थ

| | |
|---|---|
| अति | खूप (a lot, very much) |
| आस | तीव्र इच्छा, ओढ (ardent wish, desire) |
| आसावली | आतुर झाली (excited) |
| चंद्रमा | चंद्र (moon) |
| जीवा | प्राणाला (to my soul) |
| तैसे | तसे (like that, similarly) |
| दावी | दाखवा (to show) |
| पूर्णिमा | पौर्णिमा (full moon day) |
| मज | मला (to me) |
| मुळा | निमित्ताने (on the occasion of) |
| भुकेलिवा | भुकेले (hungry) |
| भेटीलागी | भेटीसाठी (for meeting someone) |
| लेकी | मुलगी (daughter) |
| वाटुली | वाट, प्रतीक्षा (waiting) |
| शोक | खूप दु:ख (sorrow, grief) |
| श्रीमुख | भगवंताचे मुख (face of god) |

### वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| आस लागणे | तीव्र इच्छा, ओढ लागणे. (to crave for something) |
| वाट पाहणे. | प्रतीक्षा करणे. (to wait) |

### टीप

| | |
|---|---|
| चकोर | एक काल्पनिक पक्षी, जो चंद्रकिरणे पिऊन जीवन जगतो. |

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**भेटीची आस व्यक्त करण्यासाठी संत तुकारामांनी दिलेले दृष्टांत**

☐ ☐ ☐

**उत्तर :** १. सासुरवाशीण लेक
२. चकोर
३. भुकेले बाळ

Sample content

**२. चौकटी पूर्ण करा.**

**जसे :** चंद्रमा ⟷ चकोर

i. माऊली ⟷ ______

ii. ______ ⟷ लेक

iii. संत तुकाराम ⟷ ______

**उत्तर :** i. बाळ ii. दिवाळी iii. श्रीविठ्ठल

***३. तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|---|
| i. | चकोर | | चंद्रकिरण हेच त्याचे जीवन |
| ii. | | माहेरचे बोलावणे येणे | |
| iii. | भुकेलेले बाळ | | |
| iv. | | पांडुरंगाची | |

**उत्तर :**

| क्र. | वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|---|
| i. | चकोर | **पौर्णिमेच्या चंद्राची** | चंद्रकिरण हेच त्याचे जीवन |
| ii. | **लेक** | माहेरचे बोलावणे येणे | **माहेराची आस** |
| iii. | भुकेलेले बाळ | **आईची** | **भुकेने व्याकुळ** |
| iv. | **संत तुकाराम** | पांडुरंगाची | **परमेश्वर दर्शनाची ओढ** |

**४. योग्य अर्थ शोधा.**

*i. आस लागणे म्हणजे ______

अ. ध्यास लागणे ब. उत्कंठा वाढणे

क. घाई होणे ड. तहान लागणे

*ii. वाटुली म्हणजे ______

अ. धाटुली ब. वाट

क. वळण ड. वाट पाहणे

iii. भुकेलिवा म्हणजे ______

अ. भुकेले ब. आसुसलेले

क. व्याकुळलेले ड. झोपलेले

**उत्तर :** i. ध्यास लागणे ii. वाट

iii. भुकेले

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २**

**[भेटीलागीं जीवा .................... दांवी देवा।।५।।]**

## कृती २ – आकलन

**१. 'चकोराला' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर :** पौर्णिमेचा चंद्र कोणाला जीवनासमान आहे?

**२. समान अर्थाच्या काव्यपंक्ती शोधून लिहा.**

i. जीवाला परमेश्वराच्या भेटीची ओढ लागली आहे.

ii. दिवाळीच्या सणाची लेक आतुरतेने वाट पाहते.

iii. भुकेले लेकरू खूप रडत आहे.

iv. देवा आता तू मला दर्शन दे.

**उत्तर :** i. भेटी लागी जीवा लागलीसे आस।

ii. दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली।

iii. भुकेलिया बाळ अति शोक करी।

iv. धांवूनि श्रीमुख दांवी देवा।

## कृती ३ – कवितेतील शब्दांचे अर्थ

**१. खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

i. भेटीलागी – भेटीसाठी ii. जीव – प्राण

iii. चंद्रमा – चंद्र iv. आसावली – आतुर झाली

## कृती ४ – काव्यसौंदर्य

**१. 'पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन । तैसें माझें मन वाट पाहे।।' या ओळींतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'भेटीलागी जीवा' या अभंगात संत तुकाराम आपली विठ्ठलभेटीची ओढ व्यक्त करतात. यासाठी ते चंद्रकिरणांकरिता आसुसलेल्या चकोराचा दृष्टांत देतात.

चकोर पौर्णिमेच्या चंद्राची खूप वाट पाहतो. जणू पौर्णिमेचे चंद्रकिरण हेच त्याचे जीवन असते. ज्याप्रमाणे चकोर पक्षी पौर्णिमेच्या चंद्राची आतुरतेने वाट पाहतो. तसेच, विठूमाऊलीचे दर्शन व्हावे यासाठी मीदेखील रात्रंदिवस वाट पाहत आहे, असा अर्थ कवी येथे व्यक्त करतो. अशाप्रकारे, चकोराच्या दृष्टांतातून संत तुकाराम आपली प्रभूदर्शनाची व्याकुळता व्यक्त करतात.

**२. 'दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली। पाहातसे वाटुली पंढरीची।।' या ओळींतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'भेटीलागी जीवा' या अभंगात संत तुकाराम विठ्ठलभेटीची ओढ व्यक्त करतात. यासाठी त्यांनी लग्न होऊन नुकत्याच सासरी गेलेल्या मुलीला माहेरची लागलेली ओढ आणि त्यासाठी तिचे दिवाळीच्या सणाला माहेराहून निरोप घेऊन येणाऱ्या व्यक्तीची वाट पाहणे याचा दृष्टांत दिला आहे.

Sample Content

नुकत्याच लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीला दिवाळीच्या सणाला माहेरी बोलावण्याची परंपरा आहे. त्यासाठी ते आमंत्रण घेऊन तिचा भाऊ किंवा नातेवाईक सासरी जातात. सासरी आलेली नववधू या निरोप घेऊन येणाऱ्या व्यक्तीची ज्या आतुरतेने वाट पाहते त्याच आतुरतेने संत तुकाराम विठ्ठलाच्या भेटीची वाट पाहत आहेत असे या ओळींतून व्यक्त होते. विठ्ठलभेटीची ओढ, व्याकुळता या ओळींमधून संत तुकाराम व्यक्त करतात.

३. **'भुकेलिवा बाळ अति शोक करी।**
**वाटे पाहे उरि माऊलीची।।**
**तुका म्हणे मज लागलीसे भूक।**
**धांवूनि श्रीमुख दांवी देवा।।'**
**या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'भेटीलागी जीवा' या अभंगात संत तुकाराम आपली विठ्ठलभेटीची ओढ व्यक्त करतात. यासाठी ते आईकरिता आसुसलेल्या बाळाचा दृष्टांत देतात.

भुकेले तान्हे बाळ आपल्या माऊलीची वाट पाहत असते, तिच्यासाठी ते रडून रडून गोंधळ घालते. आईच्या दुधासाठी जसे ते आसुसलेले असते तसाच मीही पांडुरंगा, तुझ्या दर्शनासाठी आसुसलो आहे. मला तुझ्या दर्शनाची भूक लागली आहे. त्या भुकेने मी व्याकुळ झालो आहे. तेव्हा, हे देवा! तू आता धावत येऊन तुझे श्रीमुख मला दाखव.' म्हणजेच, मला तुझे दर्शन घडू दे अशी विनंती ते या ओळींतून परमेश्वराला करतात. यातून त्यांचा परमेश्वराबद्दलचा तीव्र प्रेमभाव व्यक्त होतो.

## मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती

१. **खालील कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

i. **प्रस्तुत कवितेच्या कवीचे/कवयित्रीचे नाव लिहा.**

**उत्तर :** कवी - संत तुकाराम [तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे)]

ii. **प्रस्तुत कवितेचा विषय लिहा.**

**उत्तर :** आपल्या मनातील विठ्ठल भेटीची ओढ व्यक्त करणे हा या अभंगाचा विषय आहे.

iii. **'भेटीलागीं जीवा लागलीसे आस।**
**पाहे रात्रंदिवस वाट तुझी।।' या ओळींचा सरळ अर्थ लिहा.**

**उत्तर :** हे विठ्ठला, माझ्या जीवाला तुझ्या भेटीची ओढ लागली आहे. रात्रंदिवस मी तुझी वाट पाहत आहे.

iv. **हा अभंग आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण**

**उत्तर :** 'भेटीलागी जीवा' हा अभंग मला अतिशय आवडतो. या अभंगातून तुकाराम महाराजांनी आपल्या मनातील विठ्ठलभेटीची ओढ अतिशय उत्कटतेने व्यक्त केली आहे. त्यासाठी त्यांनी वापरलेले दृष्टांत (उदाहरणे) अतिशय समर्पक आहेत. त्यामुळे, सर्वसामान्यांच्या मनाला ते भावतात. पौर्णिमेच्या चंद्रासाठी आतुरलेला चकोर, माहेराच्या ओढीने आसुसलेली सासुरवाशीण लेक, माऊलीसाठी रडणारे लेकरू या उदाहरणांतून त्यांची विठ्ठल दर्शनाची ओढ, व्याकुळता आपल्या मनाला भिडते. या सर्व कारणांमुळे हा अभंग मला खूप आवडतो.

v. **खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

अ. आस – तीव्र इच्छा, ओढ
ब. वाटुली – वाट
क. शोक – खूप दु:ख
ड. दावी – दाखवा

## अभंगावर आधारित कृती

*१. **भावार्थाधारित.**

i. **संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दृष्टांतातील तुम्हांला आवडलेला दृष्टांत स्पष्ट करा.**

**उत्तर :** 'भेटीलागी जीवा' या अभंगातील सर्व दृष्टांतांपैकी मला भुकेने व्याकुळ झालेल्या बाळाचा दृष्टांत फार आवडतो.

लहान लेकरू आपल्या सर्व गरजांसाठी आईवरच अवलंबून असते. त्याला भुकेची जाणीव झाली, की ते जोरजोरात रडू लागते. रडून रडून गोंधळ घालते. आपल्या आईच्या प्रेमळ स्पर्शासाठी, दुधासाठी ते आसुसलेले असते. तिची वाट पाहत असते. ही जी भुकेल्या लेकराची आईसाठीची ओढ आहे तशीच तुकाराम महाराजांनाही आपल्या विठूमाऊलीच्या भेटीची ओढ वाटत आहे. अशाप्रकारे, आई व लेकराच्या नात्याद्वारे आपल्या मनातील विठ्ठलभेटीची तीव्र आस व्यक्त करणारा संत तुकारामांचा हा दृष्टांत मला फार आवडतो.

ii. **चकोराच्या दृष्टांतातून संत तुकाराम काय सिद्ध करू इच्छितात, ते तुमच्या शब्दांत लिहा.**

(**टीप :** या उत्तरासाठी विद्यार्थ्यांनी 'कृती ४- काव्यसौंदर्य' मधील क्र. १ चे उत्तर पाहावे.)

Sample Content

## भाषाभ्यास

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

**१. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

i. रात्रंदिवस ii. यशापयश
iii. भाजीपाला iv. दरदिवशी

**उत्तर :**

| क्र. | सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | रात्रंदिवस | रात्र आणि दिवस | इतरेतर द्वंद्व समास |
| ii. | यशापयश | यश किंवा अपयश | वैकल्पिक द्वंद्व समास |
| iii. | भाजीपाला | भाजी, पाला वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| iv. | दरदिवशी | प्रत्येक दिवशी | अव्ययीभाव समास |

**२. 'ती मुलगी हरिणीसारखी पळते' या वाक्यातील उपमेय, उपमान, साधर्म्यदर्शक शब्द व समान गुण ओळखा.**

**उत्तर :**

| उपमेय | उपमान | साधर्म्यदर्शक शब्द | साधर्म्यदर्शक गुण |
|---|---|---|---|
| ती मुलगी | हरिणी | सारखी | चपळता |

**३. खालील शब्दांचे सरळरूप, सामान्यरूप व प्रत्यय ओळखून लिहा.**

i. दिवाळीच्या ii. माऊलीची
iii. पौर्णिमेचा iv. धावूनि

**उत्तर :**

| क्र. | शब्द | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|---|
| i. | दिवाळीच्या | दिवाळी | दिवाळी | च्या |
| ii. | माऊलीची | माऊली | माऊली | ची |
| iii. | पौर्णिमेचा | पौर्णिमा | पौर्णिमे | चा |
| iv. | धावूनि | धावणे | धावू | नि |

**४. खालील शब्दांच्या जाती ओळखा.**

i. दिवाळी – नाम ii. पाहातसे – क्रियापद
iii. चंद्रमा – नाम iv. तुझी – सर्वनाम

**५. खालील वाक्यांतील काळ ओळखा.**

i. मी पत्र लिहीत होतो. – अपूर्ण भूतकाळ
ii. वनिता चिनूसोबत खेळते. – साधा वर्तमानकाळ
iii. मी रोज दूध पित जाईन. – रीती भविष्यकाळ
iv. ती रडत आहे. – अपूर्ण वर्तमानकाळ

**६. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. आस लागणे ii. वाट पाहणे

**उत्तर :**

**i. आस लागणे** – तीव्र इच्छा, ओढ लागणे.
**वाक्य :** मनूला गावी राहणाऱ्या आपल्या आईला भेटण्याची **आस लागली होती.**

**ii. वाट पाहणे** – प्रतिक्षा करणे.
**वाक्य :** जंगलात फिरायला जाण्यासाठी आम्ही आमच्या एका दोस्ताची **वाट पाहत होतो.**

### ब. भाषिक घटकांवर आधारित कृती

**१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. आस – ओढ, इच्छा
ii. रात्र – निशा, रजनी, यामिनी
iii. दिवस – दिन
iv. चंद्र – शशी, सुधाकर, इंदू, हिमांशू
v. लेक – मुलगी, कन्या, तनया, नंदिनी
vi. माऊली – आई, माता, जननी

**२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. रात्र × दिवस ii. शोक × आनंद, सुख
iii. पौर्णिमा × अमावास्या

**३. खालील शब्दांचे वचन बदला.**

i. भेट – भेटी ii. वाट – वाटा
iii. लेक – लेकी iv. मन – मने
v. रात्र – रात्री vi. दिवस – दिवस

**४. खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.**

i. इच्छिलेली वस्तू देणारी गाय – कामधेनू
ii. चार रस्ते एकत्र येतात ती जागा – चौक
iii. देव नाही असे मानणारा – नास्तिक
iv. मोफत पाणी मिळण्याची सोय – पाणपोई

**५. खालील शब्दापासून नवीन शब्द तयार करा.**

चकोराजीवन – कोरा, जीवन, वन, जीव, कोन, चव, राव, नवरा, राजीव, राजी, रान, वचन, चरा.

Sample content

**६. लेखननियमांनुसार योग्य शब्द निवडून लिहा.**

i. श्रीमुख / श्रीमूख / श्रिमुख / श्रिमूख – श्रीमुख

ii. चंद्रमा / चद्रंमा / चंदरमा / चन्दम्रा – चंद्रमा

iii. भूक / भुक / भूख / भुख – भूक

iv. दिवाळि / दीवाळी / दिवाळी / दिवळी – दिवाळी

**७. खालील वाक्यांत विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**

**i. वा काय प्रसन्न वातावरण आहे आज**

**उत्तर :** वा! काय प्रसन्न वातावरण आहे आज!

**ii. नीलू सुलूला म्हणाली चल आपण खेळू**

**उत्तर :** नीलू सुलूला म्हणाली, "चल, आपण खेळू."

**iii. रमेशने तिला विचारले तुझं नाव काय**

**उत्तर :** रमेशने तिला विचारले, "तुझं नाव काय?"

**iv. राहूलने अभ्यास केला नव्हता**

**उत्तर :** राहूलने अभ्यास केला नव्हता.

**उपक्रम**

***१. संत बहिणाबाईंचा 'जलाविण मासा' हा अभंग मिळवून वर्गात त्याचे वाचन करा.**

***२. संत कान्होपात्रा यांचा 'नको देवराया अंत आता पाहू' हा अभंग मिळवून वाचा.**

(**टीप :** वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावा.)

Sample Content

Page no. **7** to **132** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# व्याकरण विभाग

## १. समास

रोजच्या जीवनात एकमेकांशी बोलताना, परस्पर विचारांच्या आदानप्रदानाचे काम आपण भाषेच्या माध्यमातून करत असतो. नेहमीची बोलीभाषा व प्रमाणभाषा यांचा वापर आपण व्यवहारात करतो. या भाषेत अनेकदा आपण काही जोडशब्द वापरतो. दोन शब्द एकत्र येऊन एक जोडशब्द बनतो. या जोडशब्दामधले काही शब्द हे गृहीत धरलेले असतात. एका वाक्याचे काम एका शब्दात होत असेल, तर संपूर्ण वाक्य बोलायची किंवा लिहायची आवश्यकता नाही, हे लक्षात ठेवून आपण तो शब्द वाक्याच्या अर्थाने वापरतो. उदा. बटाटे घालून तयार केलेले पोहे हे मोठे वाक्य बोलण्यापेक्षा आपण 'बटाटेपोहे' असे म्हणतो किंवा पुरण घालून तयार केलेली पोळी असे म्हणण्यापेक्षा 'पुरणपोळी' असा शब्दप्रयोग आपण करतो. असे अनेक शब्द आपण सर्रास वापरतो.

अशाच दोन शब्द एकत्र येऊन तयार होणाऱ्या सामासिक शब्दांचा व समासांचा आता अभ्यास करू.

### सामासिक शब्द

**समास** : दोन शब्द एकमेकांशेजारी आले, की त्यांच्यातील परस्परसंबंध दाखविणारे शब्द किंवा प्रत्यय यांचा लोप करून जो एक स्वतंत्र जोडशब्द आपण तयार करतो त्यास **'सामासिक शब्द'** म्हणतात. हा सामासिक शब्द तयार करण्याच्या रीतीला **'समास'** असे म्हणतात.

**विग्रह** : सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्याकरिता आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला **'विग्रह'** असे म्हणतात. विग्रह म्हणजे कमीत कमी शब्दांत सामासिक शब्दांचे केलेले स्पष्टीकरण.

'गायरान' हा सामासिक शब्द असून 'गाईसाठी रान' हा त्याचा विग्रह होय. समासात कमीत कमी दोन शब्द येतात. या शब्दांनाच 'पदे' म्हणतात. अर्थाच्या दृष्टीने त्यातील कोणत्या पदाला प्राधान्य आहे, यावर त्या समासाचा प्रकार ठरतो. समासाचे चार प्रकार पडतात.

| क्र. | समासाचे नाव | प्रधान पद | उदाहरण |
|---|---|---|---|
| १. | अव्ययीभाव | पहिले | पदोपदी, आजन्म |
| २. | तत्पुरुष | दुसरे | गायरान, राजवाडा |
| ३. | द्वंद्व | दोन्ही | बरेवाईट, पितापुत्र |
| ४. | बहुव्रीही | अन्य | गजमुख, चंद्रमौली |

यावर्षी आपण **'अव्ययीभाव समास'** व **'द्वंद्व समास'** यांचा अभ्यास करणार आहोत.

### अव्ययीभाव समास

ज्या सामासिक शब्दातील पहिले पद बहुधा अव्यय असून ते प्रमुख असते व ज्या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणासारखा केलेला असतो, त्या समासाला 'अव्ययीभाव समास' असे म्हणतात.

**टीप :** आ, यथा, प्रति इत्यादी उपसर्गांना संस्कृत भाषेत 'अव्यय' म्हणतात.

**उदाहरणे :**

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| यथाविधी | विधीप्रमाणे |
| यथाक्रम | क्रमाप्रमाणे |
| प्रतिसाल | प्रत्येक साल |
| प्रतिमहिना | प्रत्येक महिना |
| दिवसेंदिवस | प्रत्येक दिवशी |
| जागोजागी | प्रत्येक जागी |
| रस्तोरस्ती | प्रत्येक रस्ती |
| दरमजल | प्रत्येक मजल |
| हरघडी | प्रत्येक घडी |
| बिनतोड | तोडा (उपाया) शिवाय |
| बेलाशक | शंकेशिवाय |
| विनाकारण | कारणाशिवाय |
| अन्यत्र | दुसऱ्याच ठिकाणी |
| गैरशिस्त | शिस्तीशिवाय |

**टीप :** जागोजागी, घरोघरी यांसारख्या शब्दांत जरी अव्यय दिसत नसले तरी त्या शब्दांचा विग्रह अव्ययासोबत केला जातो, म्हणूनच अशा शब्दांचा अव्ययीभाव समासात समावेश होतो.

### द्वंद्व समास

ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या समान दर्जाची असतात, त्यास 'द्वंद्व समास' असे म्हणतात. ही पदे **'आणि, व'** अशा समुच्चयबोधक, तर **'अथवा, किंवा'** अशा विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

**उदा.** रामलक्ष्मण – राम आणि लक्ष्मण
पापपुण्य – पाप किंवा पुण्य

**द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत.**

१. इतरेतर द्वंद्व समास
२. वैकल्पिक द्वंद्व समास
३. समाहार द्वंद्व समास

Sample Content

१. **इतरेतर द्वंद्व समास :**
ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास 'इतरेतर द्वंद्व समास' असे म्हणतात.

**उदाहरणे :**

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| हरिहर | हरी आणि हर |
| कटिखांदी | कटी आणि खांदी |
| लेकीसुना | लेकी आणि सुना |
| तहानभूक | तहान आणि भूक |
| सासूसासरे | सासू आणि सासरे |
| हातपाय | हात आणि पाय |
| बहीणभाऊ | बहीण आणि भाऊ |
| सुंठसाखर | सुंठ आणि साखर |
| नवराबायको | नवरा आणि बायको |
| मायलेक | माय आणि लेक |
| नरनारी | नर आणि नारी |
| विटीदांडू | विटी आणि दांडू |
| दु:खीकष्टी | दु:खी आणि कष्टी |
| नेआण | ने आणि आण |
| पतिपत्नी | पती आणि पत्नी |
| प्रश्नोत्तरे | प्रश्न आणि उत्तरे |
| कपबशी | कप आणि बशी |
| आवडनिवड | आवड आणि निवड |
| दिवसरात्र | दिवस आणि रात्र |
| लुळापांगळा | लुळा आणि पांगळा |
| सुखदु:ख | सुख आणि दु:ख |

२. **वैकल्पिक द्वंद्व समास :**
ज्या समासाचा विग्रह करताना 'अथवा', किंवा 'वा' या विकल्प दाखवणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास 'वैकल्पिक द्वंद्व समास' असे म्हणतात. या समासात अर्थाच्या दृष्टीने एकाच पदाची निवड अपेक्षित असते.

**उदाहरणे :**

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| एकदोन | एक किंवा दोन |
| निंदास्तुती | निंदा किंवा स्तुती |
| तीनचार | तीन किंवा चार |
| सत्यासत्य | सत्य किंवा असत्य |
| आठपंधरा | आठ किंवा पंधरा |
| अर्धापाऊण | अर्धा किंवा पाऊण |
| पाचपन्नास | पाच किंवा पन्नास |
| दीडदोन | दीड किंवा दोन |
| कमीअधिक | कमी किंवा अधिक |
| स्पृश्यास्पृश्य | स्पृश्य किंवा अस्पृश्य |
| आजकाल | आज किंवा काल |
| खरेखोटे | खरे किंवा खोटे |

३. **समाहार द्वंद्व समास :**
ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो, त्यास 'समाहार द्वंद्व' असे म्हणतात.

**उदाहरणे :**

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| बाजारहाट | बाजारात खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू वगैरे |
| केरकचरा | विविध प्रकारचा कचरा वगैरे |
| कपडालत्ता | विविध कपडे, पोशाख वगैरे |
| पानपत्रावळ | पाने, पत्रावळी, द्रोण वगैरे |
| हळदीकुंकू | हळदी, कुंकू वगैरे |
| ख्यालीखुशाली | ख्याली, खुशाली वगैरे |
| वास्तपुस्त | विचारपूस, चौकशी वगैरे |
| मुलंबाळं | मुलं, बाळं वगैरे |
| भांडीकुंडी | भांडी, इतर सामान वगैरे |
| शेतीवाडी | शेती, वाडी वगैरे |
| पैसाअडका | पैसा, संपत्ती वगैरे |
| दागदागिने | विविध दागिने वगैरे |
| गप्पागोष्टी | गप्पा, गोष्टी वगैरे |
| गुरंढोरं | गुरं, ढोरं, इतर पशूधन वगैरे |
| लग्नकार्य | लग्न, समारंभ वगैरे |
| पानसुपारी | पान, सुपारी वगैरे |
| स्नेहीसोबती | स्नेही, सोबती वगैरे |
| अन्नवस्त्र | अन्न, वस्त्र वगैरे |
| सभासंमेलन | सभा, संमेलने वगैरे |
| मीठभाकर | मीठ, भाकरी, इतर खाद्यपदार्थ. |
| भाजीपाला | भाजी, पाला, मिरची, कोथिंबीर इत्यादी. |

## सरावासाठी कृती

१. **खालील शब्दसमूहांपासून सामासिक शब्द बनवा.**
i. कारणाशिवाय – विनाकारण
ii. प्रत्येक महिना – प्रतिमहिना, प्रतिमाह
iii. क्रमाप्रमाणे – यथाक्रम

Sample content

Page no. **135** to **147** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# १ पत्रलेखन



**टीप : पत्रलेखनात इयत्ता १०वी च्या नवीन कृतिपत्रिका प्रारूपानुसार अपेक्षित बदल केलेले आहेत.**

पत्रलेखन ही एक कला मानली जाते. आपल्या मनातील भाव किंवा विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे, तसेच आपल्या भावना किंवा विचारांना चांगल्या भाषेत संक्रमित करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

## पत्रलेखनाची गरज

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांचा वापर करणे सहज शक्य झाल्याने प्रत्यक्ष पत्रलेखनाची गरज बऱ्याच प्रमाणात कमी झालेली असली तरी पत्रलेखनाकरिता नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे ही आता काळाची गरज बनली आहे.

अनौपचारिक पत्राद्वारे आपल्या भावना प्रभावीपणे व्यक्त करता येणे, तसेच औपचारिक पत्राद्वारे आपले म्हणणे, विचार, मागणी, विनंती इत्यादी बाबी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तिंपर्यंत पोहोचवणे हे अत्यंत महत्त्वाचे लेखनकौशल्य आहे. हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखन करणे आवश्यक आहे.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| क्र. | औपचारिक (व्यावहारिक) | | अनौपचारिक (घरगुती कौटुंबिक) |
|---|---|---|---|
| १. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.<br>उदाहरणार्थ : मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. पुढे अचूक पत्ता नमूद करावा. | १. | व्यक्तीचा उल्लेख योग्य प्रकारे, नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक करावा.<br>उदाहरणार्थ :<br>**नाते** — **मायना** — **अभिवादन**<br>आई/ वडील – तीर्थरूप } साष्टांग नमस्कार<br>काका/ काकू इत्यादी – तीर्थस्वरूप } साष्टांग नमस्कार<br>भावंडं – प्रिय — शुभाशीर्वाद |
| २. | पत्राचा मूळ विषय थोडक्यात लिहावा. | २. | पत्राचा विषय लिहिण्याची आवश्यकता नसते. |
| ३. | अचूक आणि मोजक्या शब्दांत नेमका आशय लिहावा लागतो. | ३. | व्यक्तीची खुशाली विचारावी. भावना प्रभावी शब्दांत मांडाव्यात, तसेच नात्यातील जिव्हाळा व्यक्त करणारे लेखन करावे. |
| ४. | पत्राचा समारोप करताना आवश्यकतेनुसार 'कळावे', 'तसदीबद्दल क्षमस्व' हे शब्द वापरावेत. त्यानंतर 'आपला विश्वासू'/ 'आपला नम्र'/ 'आपला कृपाभिलाषी' लिहावे. | ४. | पत्राचा समारोप करताना 'लोभ असावा', 'कळावे', हे शब्द आवश्यकतेनुसार लिहावेत. |
| ५. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. | ५. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा. |

[**टीप :** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. सर्व पत्रांची मांडणी इ-पत्रानुसार डाव्या बाजूस लिहिणे अपेक्षित आहे. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)]

Sample Content

## पत्रलेखनाचे प्रकार

**पत्रलेखन**

- अनौपचारिक
  - जवळच्या, जिव्हाळ्याचे नाते असणाऱ्या व्यक्तिला पाठवले जाणारे पत्र → • कौटुंबिक पत्र (अभिनंदन पत्र)
- औपचारिक
  - कार्यालयीन व व्यावसायिक कामकाजानिमित्त पाठवले जाणारे पत्र → • मागणी पत्र • तक्रार पत्र

## औपचारिक पत्राचा प्रारूप नमुना

दिनांक ________

प्रति, ________
माननीय ________ ,

विषय : ________

महोदय, ________

मुख्य मजकूर

आपला / आपली

__________

पत्ता

__________

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

यावर्षी आपण स्वपरिचय, मागणी, तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत. कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात, बातमी इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असेल. त्याचे आकलन करून पत्रलेखन प्रारूपात कृतीतील मुद्दे गुंफत, विषयानुसार प्रभावी भाषेचा वापर करत पत्रलेखन करायचे आहे.

## स्वपरिचय पत्र

स्वपरिचय पत्र म्हणजे स्वत:बद्दलची थोडक्यात माहिती असते. ती संक्षिप्त; पण प्रभावी स्वरूपात असल्यास आपल्या निवडीची शक्यता वाढते. स्वपरिचय पत्राची मांडणी अशी करावी.

१. स्वपरिचय पत्र लिहिताना सुरुवातीला आपले पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ-मेल व जन्मतारीख इत्यादी तपशील लिहावेत.
२. त्यानंतर तपशीलवार आपली शैक्षणिक पात्रता लिहावी. तसेच, काही विशेष प्रशिक्षण घेतले असल्यास तेही नमूद करावे.
३. आपले छंदही लिहावेत. यामुळे, व्यक्तिमत्त्व समजण्यास मदत होते.
४. यानंतर आजवर तुम्हांला असलेला प्रशिक्षणाचा, कामाचा अनुभव विस्तृतपणे लिहावा व पारितोषिके प्राप्त असल्यास त्यांचाही आवर्जून उल्लेख करावा.
५. इतर कलांमध्ये प्रावीण्य मिळवलेले असल्यास तेही नमूद करावे.

अशाप्रकारे, वरील मुद्द्यांची व्यवस्थित मांडणी केल्यास स्वपरिचय पत्र प्रभावीपणे लिहिता येऊ शकते.

**[टीप : स्वपरिचयपत्रातील सर्व माहिती विषयानुरूप ; परंतु काल्पनिक असावी.]**

Sample Content

नमुनादाखल पुढील पत्रे अभ्यासा.

*१. **खालील निवेदन वाचा व संबंधित विषयासाठी स्वपरिचय पत्र तयार करा.**

महात्मा फुले विद्यालय बुलढाणा
आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठी
**एकपात्री प्रयोग कलाकारांची निवड**
इच्छुक विद्यार्थ्यांकडून स्वपरिचय पत्र
मागवण्यात येत आहे.

अंतिम दिनांक
दि. २६
डिसेंबर

नाट्यविभाग प्रमुख

**पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक**

**स्वपरिचय पत्राचे मुद्दे**

| | |
|---|---|
| (१) संपूर्ण नाव | (५) शैक्षणिक पात्रता/विशेष प्रशिक्षण |
| (२) पत्ता | (६) छंद |
| (३) संपर्क क्रमांक | (७) अनुभव/पारितोषिके |
| (४) जन्मतारीख | (८) इतर कलांमधील प्रावीण्य |

**उत्तर :**

दिनांक : २० नोव्हेंबर २०२३

प्रति,
माननीय नाट्यविभाग प्रमुख,
महात्मा फुले विद्यालय,
बुलढाणा - ××××××

**विषय :** एकपात्री प्रयोग कलाकार निवडीसाठी अर्ज.

माननीय महोदय,

मी मीना पवार, इयत्ता ९ वी ची विद्यार्थिनी, आपणांस सदर पत्र लिहीत आहे. आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठी एकपात्री प्रयोग कलाकारांच्या निवडीबाबतचे निवेदन सूचनाफलकावर वाचले. मला यात सहभागी होण्याची खूप इच्छा आहे, म्हणून हा अर्ज पाठवत आहे.

सोबत स्व-परिचय पत्र व पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडत आहे.

आपली विश्वासू,
मीना पवार,
१२, लाभ अपार्टमेंट,
ता. देऊळगाव,
बुलढाणा - ××××××
इ-मेल - meenapawar@gmail.com

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. IX:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

### PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

### PERFECT SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

### PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

### PRECISE SERIES
- History, Political Science and Geography
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

### PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

### Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) – SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) – SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions

## OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Statponery

Visit Our Website

Published by:
Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning



Explore our range of
STATIONERY

B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z, Wagle Industrial Estate, Thane (W)-400604 | 88799 39712 / 14 | 88799 39713 / 15
www.targetpublications.org | mail@targetpublications.org